# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## संगीत विभाग

## पर्यायवाचक प्रश्नसंच

**बी. ए. भाग-२ (सत्र-४)** **प्रा. डॉ. ज्वाला नागले**

१) बागेश्री राग काफी थाटातून उत्पन्न् होतो.

२) भिम्पलास राग काफी थाटातून उत्पन्न होतो.

३) कामोद राग कल्याण थाटातून उत्पन्न होतो.

४) केदार राग कल्याण थाटातून उत्पन्न होतो.

५) तिलक कामोद राग खमाज थाटातून उत्पन्न होतो.

६) भिम्पलास रागाची जाती ओडव संपूर्ण आहे.

७) भिम्पलास रागात आरोही रे ध वर्ज्य आहेत.

८) भिम्पलास रागाचा गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर आहे.

९) भिम्पलास रागाचे वादी-संवादी म सा आहेत.

१०) केदार रागाची जाती ओडव - षाडव आहे.

११) सा म असा उठाव केदार रागात करतात.

१२) केदार रागात दोन्ही मध्यमांचा प्रयोग केला जातो.

१३) कामोद रागामध्ये दोन्ही मध्यमांचा प्रयोग केला जातो.

१४) केदार व कामोद हे दोन्ही राग रात्रीच्या पहिल्या प्रहरी गातात.

१५) केदार व कामोद या रागामध्ये कोमल नी स्वराचा विवादी या नात्याने प्रयोग होतो.

१६) केदार रागाचे वादी-संवाद म सा आहेत.

१७) कामोद रागाचे वादी-संवाद प रे आहेत.

१८) कामोद रागामध्ये रे प स्वरसंगतीचा प्रयोग होतो.

१९) कामोद रागामध्ये ग स्वराचा अवरोहात वक्र प्रयोग करतात.

२०) तिलककामोद रागाचे वादी-संवादी सा प आहेत.

२१) तिलककामोद रागाचा गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर आहे.

२२) तिलककामोद रागाची जाती ओडव-षाडव आहे.

२३) तिलककामोद रागामध्ये सां प ही अवरोही मींड चित्तवेधक आहे.

२४) तिलककामोद रागाचे चलन वक्र आहे.

२५) बागेश्री रागाची जाती ओडव संपूर्ण आहे.

२६)	बागेश्री रागाच्या आरोहात रे प वर्ज्य आहेत.

२७)	बागेश्री रागाचे वादी-संवादी म सा आहेत.

२८)	बागेश्री रागात पंचम स्वर अल्प आहे.

२९)	बागेश्री रागाचा गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर आहे.

३०)	धम, धग या स्वरसंगतीचा प्रयोग बागेश्री रागात करतात.

३१)	चौताल चा उपयोग धृपद गायनाकरीता होतो.

३२)	चौतालासारखेच बोल असणारा पण दहा मात्रांचा ताल सुलताल आहे.

३३)	तिव्रा तालामध्ये एकही काल नाही.

३४)	रूपक तालाच्या पहिल्या मात्रेवर काल देतात.

३५)	केरवा तालाचा उपयोग विशेषत्वाने सुगम व चित्रपट संगीतासाठी होतो.

३६)	रूपक तालाचाउपयोग मध्यविलंबीत लयीचे ख्याल गायनासाठी होतो.

३७)	दादरा तालामध्ये दादरा गीतप्रकार गातात.

३८)	झपतालामध्ये मध्यविलंबीत लयीच्या ख्याल रचना गातात.

३९)	मात्रा, खंड, टाळ्या व काल या दृष्टीने समानता असलेली तालजोडी एकताल-चौताल ही आहे.

४०)	केवळ मात्रा आणि खंड या दृष्टीने समानता असलेली तालजोडी रूपक तीव्रा ही आहे.

४१)	रूपक तालाच्या समेला अनाघाती सम असे म्हणतात.

४२)	झपतालाच्या मात्रा १० आहेत.

४३)	सुलतालामध्ये ५ खंड आहेत.

४४)	एकताल, चौताल, त्रिताल, केरवा, दादरा, सुलताल, इ. तालांमध्ये सम मात्रांचे खंड आहेत.

४५)	रूपक, तीव्रा, झपताल या तालांमध्ये विषम मात्रांचे खंड आहेत.

४६)	केरवा तालाची दुप्पट तिसऱ्या मात्रेपासून येईल – दोन मात्रांमध्ये.

४७)	दादरा तालाची दुप्पट चौथ्या मात्रेपासून येईल – तीन मात्रांमध्ये.

४८)	रूपक तालाची दुप्पट ३.५ मात्रेपासून येईल – ३.५ मात्रांमध्ये.

४९)	तीव्रा तालाची दुप्पट ३.५ मात्रेपासून येईल – ३.५ मात्रांमध्ये.

५०)	झपताल व सुलतालची दुप्पट ६ व्या मात्रेपासून येईल – ५ मात्रांमध्ये.

५१)	एकताल व चौतालची दुप्पट ७ व्या मात्रेपासून येईल – ६ मात्रांमध्ये.

५२)	त्रितालाची दुप्पट ९ व्या मात्रेपासून येईल – ८ मात्रांमध्ये.

५३)	त्रितालचा उपयोग शास्त्रीय गीतप्रकार गाण्यासाठी होतो.

५४)	एकतालचा उपयोग शास्त्रीय गीतप्रकार गाण्यासाठी होतो.

५५)	सुलतालचा मुख्य उपयोग धृपद गायनासाठी होतो.

५६)	त्रितालाची चौपट १३ व्या मात्रेपासून येईल – ४ मात्रांमध्ये.

५७)	एकताल व चौतालची चौपट १० व्या मात्रेपासून येईल – ३ मात्रांमध्ये.

५८)	झपताल व सुलतालची चौपट $8\frac{1}{2}$ मात्रेपासून येईल – $2\frac{1}{2}$ मात्रांमध्ये.

५९)	रूपक व तीव्रा तालाची चौपट $5\frac{1}{4}$ मात्रेपासून येईल – $1\frac{1}{4}$ मात्रांमध्ये.

६०)	दादरा तालाची चौपट $4\frac{1}{2}$ मात्रेपासून येईल – $1\frac{1}{2}$ मात्रांमध्ये.

६१)	केरवा तालाची चौपट ४ थ्या मात्रेत येईल – १ मात्रेमध्ये.

६२)	रे ध कोमल घेणाऱ्या रागांच्या वर्गामध्ये सर्व संधिप्रकाश राग येतात.

६३)	रागवर्गिकरणाच्या दृष्टीने रागांचे एकूण तीन वर्ग सांगितले आहेत.

६४)	रे ध कोमल घेणारे राग चौथ्या प्रहरी गातात.

६५)	ग नि शुद्ध घेणारे राग पहिल्या प्रहरी गातात.

६६)	ग नि कोमल घेणारे राग तिसऱ्या प्रहरी गातात.

६७)	रे ध कोमल घेणाऱ्या रागांच्या गटामध्ये भैरव, पूर्वी, मारवा या थाटातील राग येतात.

६८)	ग नि शुद्ध घेणाऱ्या रागांच्या गटामध्ये कल्याण, बिलावल या थाटातील राग येतात.

६९)	ग नि कोमल घेणाऱ्या रागांच्या गटामध्ये काफी, आसावरी, भैरवी, तोडी या थाटातील राग येतात.

७०)	सितार हे एक तंतुवाद्य आहे.

७१)	पखवाज हे एक अवनध्द वाद्य आहे.

७२)	डॉ. एन. राजम ह्या व्हायोलीन हे वाद्य वाजवीत असत.

७३)	भारतीय वाद्य वर्गीकरणाचा उल्लेख सर्वप्रथम संगीत रत्नाकर ग्रंथात आढळतो.

७४)	भारतीय वाद्यांचे एकूण चार भागांमध्ये वर्गीकरण केलेले आहे.

७५)	हवेच्या सहाय्याने वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांना सुशिर वाद्ये म्हणतात.

७६)	तार खेचून किंवा छेडून वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांना तंतुवाद्ये म्हणतात.

७७)	पशुंची कातडी मुखावर ताणून बसविलेल्या पोकळ वाद्यांना अवनध्द वाद्ये म्हणतात.

७८)	ठोस धातुंपासून बनविलेल्या वाद्यांना घनवाद्ये म्हणतात.

७९)	अवनध्द वाद्यांचा उपयोग तालवाद्ये म्हणून केला जातो.

८०)	हार्मोनियम, बासरी, शहनाई, तुतारी, शंख ही सुशीर वाद्ये आहेत.

८१)	तंबोरा, सतार, व्हायोलीन, सरोद, वीणा ही तंतुवाद्ये आहेत.

८२)	पखवाज, तबला, मृदंग, नगारा, डफ, ड्रम ही अवनध्द वाद्ये आहेत.

८३)	घंटा, झांज, बेल ही घनवाद्ये आहेत.

८४) गीतलेखन, संगीत दिग्दर्शन व गायन यामध्ये प्रवीण असणाऱ्या व्यक्तीला वाग्गेयकार म्हणतात.

८५) गुरूपरंपरेने प्राप्त संगीत विद्येमध्ये कुठलाही बदल न करता जसेच्या तसे सादर करणाऱ्याला नायक म्हणतात व त्याच्या कलेला नायकी म्हणतात.

८६) गुरूपरंपरेने प्राप्त झालेल्या संगीत विद्येमध्ये आपल्या कल्पकतेने व प्रतिभाशक्तीने अधिक रंजक करून गायन सादर करणाऱ्याला गायक म्हणतात व त्याच्या कलेला गायकी म्हणतात.

८७) स्वरांच्या कंपनाला गमक म्हणतात.

८८) एखादा राग गात असतांना त्याची रंजकता वाढविण्यासाठी दुसऱ्या नजीकच्या समप्रकृतीक रागाचे स्वर घेऊन दुसऱ्या रागाची छटा किंवा छाया निर्माण करणे या क्रियेला तिरोभाव म्हणतात व तिरोभाव केल्यानंतर पुन्हा मुळ रागामध्ये परत येण्याच्या क्रियेला अविर्भाव असे म्हणतात.

८९) रामारश्र झा यांचे टोपणनाव रामरंग आहे.

९०) गीताचा शेवट करताना अर्धी ओळ तीन वेळा म्हणणे म्हणजे तिहाई घेणे.

९१) धृपदाच्या एकूण चार बानी आहेत.

९२) धृपदगायनामध्ये साथीकरीता पखवाज व मृदंग हे तालवाद्य वाजवितात.

९३) धृपदगायनामध्ये आरंभी नाम् तोम् ची आलापी करतात.

९४) धृपदगायनामध्ये लयीचे विविध अविष्कार केले जातात.

९५) धृपद गायकांना धृपदीये म्हटले जाते.

९६) चौताल, सुलताल, ब्रह्मताल, रूद्रताल, तीव्रा या तालांमध्ये धृपदगीते गातात.

९७) गझलच्या कडव्याला शेर म्हणतात.

९८) उर्दू भाषेतील आशयपूर्ण काव्यरचना म्हणजे गझल होय.

९९) मोगुबाई कुर्डीकर या गानसरस्वती किशोरी अमोनकर यांच्या आई होत्या.

१००) अमिर खुसरो हा फारसी संगितज्ञ होता.

~~~~~
~~~~~